*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

**NAVJYOT / Vol. XII / Issue - II** **ISSN 2277- 8063**

# वंदे मातरमचा इतिहास

**Dr. Madhukar Vithoba Jadhav,** Associate Professor, Department of History,
Y.C.College, Halkarni, Tal-Chandgad, Dist-Kolhapur, mvjhistory12@gmail.com

---

**प्रस्तावना:**

भारताला स्वातंत्र्य मिळून यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने होणा-या सोहळयाला आजादी का अमृत महोत्सव असे नाव दिले आहे.आपल्या भारत देशामध्ये जन गण मन व वंदे मातरम या गीतांना विशेष महत्व आहे. वंदे मातरम हे गीत देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी करण्यात आलेल्या संघर्षाशी जोडण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. प्रत्येक देशाचे एक गीत असते त्याला राष्ट्रगीत असे म्हणतात. विशिष्ट वेळी या राष्ट्रगीताचे गायन केले जाते. मातृभूमीविषयी व देशभक्तीपर आदर भावना व्यक्त करणारे गीत म्हणजे राष्ट्रगीत होय. असे राष्ट्रगीत सर्वमान्य झालेले असते. राष्ट्रगीत हे राष्ट्राचा मानदंड असते. त्याचा आदर रोखण्याचे कार्य देशातील प्रत्येक नागरिकाला करावे लागते. राष्ट्रीय ऐक्य व सदभावना आणि राष्ट्राविषयीचा अभिमान जागृत ठेवण्याचा हेतू राष्ट्रगीतामध्ये असतो. राष्ट्राची विजयी गाथा राष्ट्रगीतात गुंफलेली असते. राष्ट्रगीतात भारताच्या यशोगाथाचे स्मरण केले असून मातृभूमीच्या जय जयकाराचा घोष आहे. भारत मातेचे वर्णन या गीतातून प्रकट झाले आहे. भारतमाता हीच रक्षणकर्ती दुर्गा लक्ष्मि ही तीच आणि विद्येचा वरदहस्त ठेवणारी सरस्वतीही तीच तिचे शक्तिशाली, चैतन्यदायी स्वरूप या गीतात स्पष्ट केलेले आहे.

**संशोधनाचे उद्देश** :

१. वंदेमातरम हे गीत आपल्या स्वातंत्र्याचे महत्व प्रकट करते.

२. वंदेमातरम हे गीत आपल्या देशाचा सांस्कृतिक वारसा, सभ्यता आणि इतिहास प्रतिबिंबित करते.

**गृहीतके** :

१. वंदेमातरम या भारतीय गीताचा इतिहास श्रेष्ठ आहे.

**मुख्य व सूचक शब्द:** मंत्रालय, तिरंगा, राष्ट्रपिता, प्रतिक, मानचिन्ह, कॅप्टन, संहिता, सभ्यता, शौर्य, स्मरण

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. महत्वपूर्ण अशा प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.याचबरोबर वर्तमानपत्रे, मासिके,साप्ताहिके या साधनांचाही वापर करण्यात आलेला आहे.

**विषय विवेचन:**

बंकिमचंद्र चटर्जी हे प्रखर देशभक्त होते. बंकिमचंद्र यांचा जन्म १६ जून १८३८ रोजी नैहाटी बंगालच्या काठालपाडा येथे झाला. त्यांच्या वडिलाचे नाव देवचंद्र चटोपाध्याय असे होते.बंकिम यांना तीन भाऊ होते.यामध्ये दोन मोठे नावे शयामचरण आणि संजीवचंद्र आणि एक लहान भाऊ पूर्णचंद्र.या चारही भावांमध्ये बंकिमचंद्र हे साहित्यात हुशार होते.बंकिमचंद्र लहानपणापासून कुशाग्र बुद्धीचे होते.न्याय व सत्याच्या बाजूने ते कायम उभे राहत असत. ते कायद्याचे शिक्षण घेत असतानाच त्यांना डेप्युटी मजिस्ट्रेट आणि डेप्युटी कलेक्टरची नोकरी लागली. त्यांनी तीस वर्षापर्यंत नियमित डेप्युटी कलेक्टरच्या पदावर नोकरी केली. इंग्रज सरकारशी मतभेद झाल्यामुळे त्यांनी स्वच्छेने नोकरी सोडली.

बंकिमचंद्र हे डेप्युटी कलेक्टर असताना इंग्रज सरकारने इ. स. १८५७ मध्ये गॉड सेव्ह दी क्वीन हे इंग्रजाचे राष्ट्रगीत भारताचे राष्ट्रगीत म्हणून रुजू करण्याच्या प्रयत्न केला. त्याचबरोबर त्यांनी हे गीत सैन्यात व शाळांमध्ये रुजवण्याचा प्रयत्न केला. इंग्रजांच्या या कृत्यामुळे भारतीय लोक संतापले. बंकिमचंद्र यांनी यावर विचार केला. भारतासाठी देशभक्तीपर गीत ७ नोव्हेंबर १८७६ साली देशभक्तीच्या भावनांनी ओथंबलेले आणि भारत देशाला मातृभूमी असे संबोधत करून तिचे नमन करणारे वंदे मातरम हे गीत लिहिले. बंकिमचंद्र चटर्जी यांनी बंगालमधील

कांतलपाडा या गंगा नदीकाठच्या गावी हे गीत रचले. त्यांनी दि. १५ डिसेंबर १८८२ रोजी प्रकाशित केलेल्या त्यांच्या आनंदमठ या कादंबरीमधील हे गीत भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे प्रेरणा गीत बनले. या कादंबरीत देशभक्त सैन्यांनी वंदे मातरम हे गीत सामुहिकपणे गाताना दाखवले. त्यांच्या आनंदमठ या कादंबरीला अभूतपूर्व असे यश मिळाले. व ही कादंबरी खूप लोकप्रिय झाली. त्यामुळे वंदे मातरम हे देश भक्तीचे अप्रतिम गीत लोकांपर्यंत पोहचले. आणि या गीताला खूप लोकप्रियता मिळाली.बंग दर्शन या मासिकात १८८० ते १८८२ या कालखंडात आनंदमठ कादंबरी प्रकाशित झाली. बंकिमचंद्र यांचा ८ एप्रिल १८९४ साली मृत्यू झाला.

इ. स. १८९६ सालच्या कलकत्ता येथील राष्ट्रीय कॉंग्रेस अधिवेशनात कवी रवींद्रनाथ टागोर यांनी वंदे मातरम गीताचे गायन केले. महान शास्त्रीय संगीततज्ञ पंडित विष्णू दिगंबर पलूसकर यांनी या गीताला चाल लावली व ती चाल अत्यंत लोकप्रिय झाली. पंडित पलूसकरांनी हे गीत चालीसह प्रथम लाहोर या ठिकाणी गायले. नंतर त्यांनी वंदे मातरम गायन विविध शहरात केले. पंडितजींच्या मधूर व ओजस्वी गायनाने लोक कमालीचे प्रभावित झाले. यावेळी प्रथमच या गीताचे सामुहिक गायन करण्यात आले. या गीतावर इंग्रज सरकारने बंदी आणली असताना रवींद्रनाथ टागोर यांची भाची सरलादेवी चौधरी यांनी वंदे मातरम हे गीत इ. स. १९०५ सालच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात म्हटले. इ. स. १९०५ मध्ये भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे संघटीत स्वरूप प्राप्त केले. मादाम कामा यांनी तिरंगा ध्वजाच्या मध्यभागी वंदेमातरम या बीज मंत्राला ठळकपणे स्थान दिले. मादाम कामा यांनी हा ध्वज इ. स. १९०७ मध्ये बर्लिन येथे फडकविला. १६ ऑगस्ट १९०८ रोजी इंग्रजांनी बंगालची फाळणी रद्द केली तेव्हा हिंदू-मुस्लिम यांनी एकत्र येऊन हे गीत गायले. सर्वांनी एकजुटीने केलेल्या या आंदोलनामुळे बंगालची फाळणी रद्द करण्यात आली. प्रथम बंगाल आणि नंतर भारतभर वंदे मातरम हे गीत गायले जाऊ लागले. १९१५ च्या कॉंग्रेस अधिवेशनापासून राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक अधिवेशनात वंदे मातरम म्हणण्याची प्रथा सुरु झाली. ती आजही चालू आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आपल्या आझाद हिंद सेनेचे समरगीत बनविले. आझाद हिंद सेनेच्या सिंगापूर रेडीओ स्टेशनवरून त्याचे नियमित प्रसारण केले जात असे. १४ एप्रिल १९०६ साली वंदे मातरमची घोषणा केल्याबद्दल मिरवणुकीवर पोलिसांनी लाठी हल्ला केला. त्या लाठी हल्ल्यात महर्षी अरविंद जखमी झाले. महर्षी अरविंद यांनी वंदे मातरम या गीताचे इंग्रजीत भाषांतर केले.

वंदे मातरम गीत म्हणजे स्वदेशी स्वाभिमानाचा महान नजराणा आहे. असे दि.केंब्रीज हिस्ट्री ऑफ इंडियात म्हटले आहे. वंदे मातरम हे गीत राष्ट्रीयतेची अभिव्यक्ती आहे व वंदे मातरम वेगाने पसरत हिंदी लोकांना प्रभावित करीत आहे. यामुळेच हे गीत राष्ट्रगीताच्या स्वरुपात हिंदी जनता ते गात आहे. असे महर्षी अरविंद यांनी आपल्या महायोगी पुस्तकात म्हटले आहे. बी. एन. पांडे या गीताबद्दल म्हणतात. स्व. बंकिमचंद्राच्या या गीताने पूर्ण भारताच्या एकूण राष्ट्रवादी आंदोलनात आपले स्थान निश्चित केले आहे. महात्मा गांधी यांच्या प्रार्थना सभेत वंदे मातरम गायले जात असे. कॉंग्रेसने इ. स. १९३७ साली वंदे मातरमच्या पुर्ननिरीक्षणासाठी एक समिती नेमली. मौलाना अब्दुल कलम आझाद, पंडित जवाहरलाल नेहरू, आचार्य नरेंद्र देव यांचा त्या समितीत समावेश होता. या समिती सदस्यांनी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचे मार्गदर्शन घेतले. इ. स. १९३७ च्या कॉंग्रेस अधिवेशनात वंदे मातरम गीताचे संशोधन झाले आणि या गाण्याची पहिली कडवीच गाण्याचा निर्णय घेण्यात आला. आणि हरिपूर येथे इ. स. १९३८ साली भरलेल्या कॉंग्रेस अधिवेशनात वंदेमातरमची दोन कडवी गाण्यात आली. आणि आजपर्यंत सर्वत्र वंदेमातरमची दोनच कडवी गायली जातात.

स्वातंत्र्यलढ्यात लोकांना एकत्र आणण्यासाठी वंदे मातरमची अत्यंत महत्वाची भूमिका आहे. लोकात देश प्रेम व स्वातंत्र्य मिळविण्याची आकांक्षा वाढीवणा-या या गीताचा प्रसार व प्रचार झाला. संपूर्ण भारत देशातून इंग्रजांनी निघून जावे असे नारे देण्यात येऊ लागले. वंदे मातरम या गीताने भारतीयांचा स्वाभिमान वाढवून त्यांच्यामध्ये एकता निर्माण झाली. भारतीय जनतेमध्ये राष्ट्रीय सन्मान वाढविण्याची इर्षा निर्माण झाली. स्वातंत्र्यासाठी एकजुटीने लढण्याची भावना निर्माण झाली. लोकशाही भारताची स्थापना झाल्यानंतर २६ जानेवारी १९५० साली राष्ट्रपती निवडी अगोदर राष्ट्रगीत निश्चित करावयाचे होते. बॅड संगीताच्या दृष्टीने जन गण मन हे गीत वंदे मातरम गीतापेक्षा अधिक योग्य ठरले. व जण गण मन हे गीत राष्ट्रगीत झाले. वंदे मातरमला राष्ट्र गीताइतकाच

दर्जा मिळाला. वंदे मातरम हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा बीजमंत्र होता. थोर देशभक्त लाला लजपतराय यांनी त्याकाळी लाहोरहून एक पाक्षिक काढले त्याचे नाव होते. वंदे मातरम इ. स. १९०५ मध्ये हिरालाल जैन यांनी भारतातील पहिला राजकीय चित्रपट बनविला व त्याचा शेवट वंदे मातरम या गीताने केला. हिंदू-मुस्लिम दोघेही सारखेच वंदे मातरमचा जयघोष करतात. अनेक क्रांतिकारक इंग्रजांचा जुलूम व अत्याचार सहन करीत व वंदे मातरमचा जयघोष करत फासावर गेले. स्वातंत्र्य आंदोलनात वंदे मातरम हा अतिशय लोकप्रिय असा जयघोष होता. कोणत्याही कार्यक्रमामध्ये भारत माता की जय आणि वंदे मातरम हे जयघोष होत आहेच आणि पुढेही तो होत राहतील.

भारतामध्ये वंदे मातरमच्या अनेक धून प्रचलित आहेत. बंकिमचंद्र चटर्जी यांनी त्या काळातील बंगाली नाट्य क्षेत्रातील लोकप्रिय संगीतकार जदुनाथ भट्टाचार्य यांच्याकडून मातरमची चाल बसवून घेतली. ही चाल अनेक वर्षे प्रचलित होती. इ. स. १९९७ मध्ये स्वातंत्र्याच्या पन्नासाव्या सोहोळ्यात संसदेत पं. भीमसेन जोशी तबला पेटी घेऊन वंदे मातरम पाच मिनिटे गायले तर सांगता समारंभात इ. स. १९९८ साली पं. जसराज हुंकाराच्या तालावर अगदी तेवढाच वेळ गायले. विसाव्या शतकामध्ये या गीताच्या ज्या चाली प्रचलित झाल्या त्यापैकी अनेक चाली भारतीय संगीताच्या रांगांवर लावल्या गेल्या. काही चित्रपटामध्ये निरनिराळ्या चालींवर हे गीत समाजासमोर आले. आनंद मठ, लीडर आणि अमर आशा या चित्रपटामध्ये निरनिराळ्या चालींवर हे गीत चित्रित केले गेले. हे गीत लता मंगेशकर यांनी सुंदरपणे गायले आहे. त्याचबरोबर हेमंतकुमार यांनीही हे गीत गायिले आहे. लोकप्रिय संगीत तज्ञ रवी शंकर यांनी आकाशवाणीकरिता या गीताची जी चल लावून दिली ती पण खूप लोकप्रिय झाली. २००२ मध्ये बीबीई वर्ल्ड सर्व्हिसने जगातील ७००० गीते निवडून सर्वात लोकप्रिय अशा पहिल्या १० गीतांकरिता एक सर्वेक्षण केले. त्यात ए. आर. रहमानच्या वंदे मातरम या गीताला जगात दुस-या क्रमांकाचे स्थान लाभले. रविशंकर व ए. आर. रहमान यांनी बनविलेल्या चाली भारतीय संगीताच्या देस या रागावर आधारित आहेत. स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव प्रसंगी लोकप्रिय संगीतकार ए. आर. रहमान यांनी वंदे मातरम हे शीर्षक असलेला गीत संग्रह प्रकाशित केला. तो लोकांना खूप आवडला.

इ. स. २०१८ मध्ये सुप्रसिध्द शास्त्रीय गायिका कल्याणी बोंद्रे यांनी वंदे मातरम या गीताला नवीन चाळीत बांधून हे गीत रसिकांसमोर आणले त्याला देखिल रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. वंदे मातरम हे राष्ट्रगीत आजही लोकप्रिय आहे. बलिदान व देशप्रेमाची ज्योत आजही वंदे मातरमच्या रूपाने तेवत आहे. शुभा मुगदल यांनी पॉप पद्धतीने व कौशिकी चटर्जी यांनी अंगाई गीताच्या स्वरुपात वंदे मातरम हे गीत गायले. रवींद्रनाथ टागोर ते ए. आर. रेहमान असा वंदे मातरम चालींचा १०० वर्षाचा इतिहास आहे. स्वातंत्र्यापूर्वी पन्नास पंच्यावन वर्षे या गीताने व वंदे मातरम ह्या शब्दांनी भारतीयांच्या मनावर अधिराज्य केले. आज ही वंदे मातरम हे शब्द प्रत्येक भारतीयांच्या मुखात आहेत. स्वातंत्र्य लढ्यात वंदे मातरम या दोन शब्दांनी व गीताने महत्त्वाची भूमिका बजावली. हे शब्द वेद मंत्राहून पवित्र मानून अनेक क्रांतिकारक हसत हसत फासावर गेले. स्वातंत्र्यानंतर हेच गीत राष्ट्रगीत होणार याची खात्री असल्यामुळे अनेकांनी त्याला वेगवेगळ्या रागात चाली बांधल्या त्यात अर्थातच मराठी व बंगाली मंडळी आघाडीवर होती. आपल्याकडे १९२५ ते ५० या काळात मास्तर कृष्णराव फुलंब्रीकर, विष्णुपंत पागनीश, केशवराव भोळे, ओंकारनाथ ठाकूर, वि. दे अंभईकर, मोगुबाई कर्डूकर, सावळाराम बुवा शेजवल संगीतकार, वसंतराव देसाई ह्यांनी वंदे मातरम गाऊन त्याच्या ध्वनीमुद्रिकाही बनविल्या. आपलीच चाल निवडावी यासाठी प्रयत्नही झाले. बंगालमध्ये दिलीपकुमार राय व एस. एस. सुब्बलक्ष्मि यांनी वंदे मातरम युगल स्वरात गायिले. त्या अगोदर भवानीचरण दास, सत्यभूषण गुप्ता, मुखर्जी यांनी हे गीत ध्वनीमुद्रित केले.

बंकमचटर्जी म्हणाले होते "मी या जगात असेन किंवा नसेन पण एक दिवस हे गीत व हे शब्द प्रत्येक भारतीयांच्या ओठांवर असेल". बिपिनचंद्र पाल यांनी विकली न्यू इंडिया मध्ये गीताची जननी ही राष्ट्रमाता आहे असे मत व्यक्त केले. श्री. अरविंद यांनी हे फक्त राष्ट्रगीत नसून पवित्र मंत्राच्या जयघोशातून उत्पन्न झालेली उर्जा असल्याचे म्हटले आहे. वंदे मातरम या गीतास ही उर्जा प्राप्त झाल्यामुळे ते ऋषीतुल्यच आहे. त्याग, बलिदान व देशप्रेमाची ज्योत आजही वंदे मातरमच्या रूपाने तेवत आहे. स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी

राष्ट्रगीतांच्या संदर्भात उदगार काढले ते असे "जन गन मन हे गीत राष्ट्रीय प्रसंगाच्या वेळी गायले जाईल. तसेच वंदे मातरम या गीतानेही भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ऐतिहासिक महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यालाही जण गण मन या गीताइतकेच श्रेष्ठत्व आहे व उच्च स्थान आहे". वंदे मातरम हे गीत रोज सकाळी रेडीओवरून ऐकवायचा निर्णयही घेण्यात आला. तेव्हापासून आजपर्यंत वंदे मातरम हे गीत रोज सकाळी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून कार्यक्रम सुरु होण्याआधी ऐकवले जाते. शाळेत सरकारी व खाजगी समारंभाची सुरुवात वंदे मातरम नंतर समारोप जन गण मन ही पद्धत रूढ होऊन सर्वमान्य झाली. भारत भूमीच्या स्वातंत्र्यलढ्याचे प्रतीक म्हणून रचलेल्या वंदे मातरम या गीताला महत्वपूर्ण स्थान आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या कालखंडामध्ये वंदे मातरम या गीताने भारतवासीयांना राष्ट्रप्रेमाची प्रेरणा दिली. या गीताचे स्फूर्ती घेऊन अनेकांनी कित्येक चळवळी व आंदोलने केली. हे गीत स्वातंत्रलढ्याचे प्रतीक म्हणून रचले गेले. यातून अनेकांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. स्वातंत्र्याची मशाल तेवत ठेवण्यासाठी व भारतीयांच्या मनामध्ये स्वातंत्र्याची उर्मी निर्माण करण्याचे कार्य वंदे मातरम या गीताने केले. वंदे मातरम या गीताला भारताच्या इतिहासामध्ये विशेष महत्त्व आहे. वंदे मातरम या गीताने भारतीयांना इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुध्द लढण्याचे बळ दिले.

**सारांश :**

जण गण मन व वंदे मातरम या दोन्ही राष्ट्रगीतांचा आदर करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे हे म्हणणे केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयात सादर केले आहे. जण गण मन आणि वंदे मातरम ही दोन्ही राष्ट्रगीते एकाच पातळीवर असून देशातील प्रत्येक नागरिकाने दोघांचा समान आदर केला पाहिजे असे मतप्रदर्शन केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयात केले. राष्ट्रगीत आणि राष्ट्रगीताबाबत याचिकेवर उच्च न्यायालयाने गृह मंत्रालय, शिक्षण मंत्रालय, सांस्कृतिक मंत्रालय, कायदा व न्याय मंत्रालय आणि इतरांकडून जनहित याचिकेवर उत्तर मागितले आहे. जन गण मन हे राष्ट्रगीत आणि वंदे मातरम हे राष्ट्रगान यांच्यात समानतेची वागणूक मिळावी तसेच वंदे मातरमला समान आदर आणि दर्जा देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे लागू करावीत अशी मागणी करणारी याचिका दाखल झाली. भारत हा राज्यांचा संघ आहे. येथे एकच राष्ट्रीयत्व असल्यामुळे दोन्ही राष्ट्रगीताचा आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. गर्गे सं. मा. [संपा], भारतीय समाजविज्ञान कोश [खंड ४], मेहता प्रकाशन, पुणे, २००७.
2. बिपीन चंद्र, इंडियाज स्टगल फॉर इंनडिफेन्स, दिल्ली, १९९०, पृष्ठ २९६.
3. शिंदे व गव्हाणे, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, औरंगाबाद, २०१५, पृष्ठ २९८.
4. गोवर बी. एल, आधुनिक भारताचा इतिहास, नई दिल्ली, २००३, पृष्ठ ३९९.
5. दिक्षित न. सी. आधुनिक भारत, नागपूर, २००३, पृष्ठ ३२०.
6. रोडे सोमनाथ, आधुनिक भारत, नागपूर, १९९८, पृष्ठ २८८.
7. देवगिरीकर त्र्य. र, भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास, नागपूर, १९८६, पृष्ठ २३२.
8. पांडये रामदीन, प्राचीन भारत की संग्रामिकता, पटना, १९५७.
9. भारतीय ध्वज संहिता, भारत सरकार गृहमंत्रालय, दिल्ली, २००६.
10. भारतीय तिरंगे का इतिहास, मिचानी, दिल्ली, २००९.
11. जावडेकर रा. द, आधुनिक भारत, पुणे, १९३८, पृष्ठ ४५०.
12. फ्लैग कोड ऑफ इंडिया, गृह मंत्रालय भरात सरकार, दिल्ली, २००५.
13. Campbell Gordon, The Book of Flags, London, 1960.
14. Edwards T.J, Military Customs, London, 1954.
15. Kangle R.P, The Kautiliya Arthasastra Parts-I, Bombay, 1960.
16. https://mr.wikipedia.org/s/4o7